महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, ३चर्च रोड,पुणे

दुरध्वनी क्र26127569-020. Email ID - aidedhostel@gmail.com

जा.क्र.स.आ. शिक्षण/अनु.वसतिगृह/अनु.वसति.जाहिरात/२०१९-२०/का-५ /9323 दि:28/०६/२०१९

प्रति,
प्रादेशिक उपायुक्त,
समाज कल्याण विभाग, (सर्व).

विषय :- राज्यातील मान्यता रद्द अनुदानित वसतिगृहांचे स्थलांतर व हस्तांतर करण्याकरिता जाहिरात प्रसिध्द करणेबाबत

संदर्भ:- १) शासन निर्णय क्र.बीसीएच-१०९७/प्र.क्र.१०७/मावक-४, दि. १६/०३/१९९८.
२) शासन निर्णय क्र.बी.सी.एच-२०१७/ प्र.क्र.२७९/शिक्षण-२, दि.२८/०६/२०१८
३) शासन पत्र क्र. बीसीएच-२०१७/प्र.क्र.२७९/शिक्षण -२, दि.२५/०१/२०१९.

राज्यातील जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेकडून मान्यता रद्द वसतिगृहांची माहिती प्राप्त करुन घेऊन संदर्भ क्र. २ च्या शासन निर्णयानुसार इच्छुक संस्थांना सदर वसतिगृह स्थलांतरीत व हस्तांतरीत करण्यासाठी जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत मान्यता मागितलेली होती. त्याप्रमाणे शासनाने संदर्भ क्र.३ च्या पत्राद्वारे आयुक्तालयाच्या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

ही जाहिरात आपल्या विभागातील जास्तीत जास्त खपाच्या दोन दैनिकामध्ये प्रसिध्द करावयाची आहे. जाहिरात प्रसिध्दीनंतर आपले कार्यालयात इच्छुक संस्थांकडून येणारे अर्ज स्विकारवयाचे आहेत. प्राप्त झालेले सर्व अर्ज जाहिरातीच्या मुद्दतीनंतर तीन दिवसांच्या आत आयुक्तालयास खास दुतामार्फत दि.२६/०७/२०१९ रोजी सोबत जोडलेल्या **प्रपत्रामध्ये यादी करुन सादर करावयाचे आहेत. जाहिराती संदर्भात खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.**

१) सोबत जोडलेला जाहिरात मसुदा आपल्या विभागातील जास्तीत जास्त खपाच्या दोन स्थानिक दैनिक वृत्तपत्रात सशुल्क जाहिरात देऊन प्रसिध्द करावा. तसेच ही जाहिरात विभागाच्या संकेतस्थळावरसुध्दा प्रसिध्द करण्यात यावी.

२) सोबत जोडलेल्या यादीतील मान्यता रद्द वसतिगृहांच्या संस्थांचे मान्यता रद्द आदेशाविरुध्द कोणत्याही न्यायालयात, शासनाकडे अपिल प्रलंबित नसल्याची आपलेस्तरावरुन खात्री करुनच यादी प्रसिध्द करावी. अपिलात असलेल्या वसतिगृहाचे नाव यादीमध्ये प्रसिध्द होणार नाही याची दक्षता घ्यावी.

३) इच्छुक संस्थेने रु.१०,०००/- ना-परतावा तत्वावर शासन खाती भरण्यासाठी प्रस्तावासोबत लेखाधिकारी (कर्ज), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेतून काढलेला धनाकर्ष (Demand Draft) प्रस्तावासोबत जोडल्याची खात्री करुनच प्रस्ताव स्विकारावेत.

४) जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर याबाबत मार्गदर्शनासाठी व इच्छुक संस्थांकडून दाखल होणारे अर्ज/ प्रस्ताव स्वतंत्र नोंदवहीत नोंद करुन संबंधितांना पोहच पावती देण्यासाठी आपले कार्यालयात स्वतंत्र पथक नियुक्त करावे.

५) जाहिरातीप्रमाणे आपले कार्यालयात प्राप्त झालेल्या प्रस्तावांची माहिती aidedhostel@gmail.com या इमेलवर दररोज अर्ज घेण्याची प्रक्रिया थांबल्यानंतर सायं. ५.४५ वाजता आयुक्तालयास सोबत जोडलेल्या नमुन्यात माहिती सादर करावी.

६) जाहिरातीच्या मुद्दतीनंतर प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत, याची दक्षता आपण वैयक्तीकरित्या घ्यावी. मुदत संपल्यानंतर तात्काळ प्राप्त अर्जाच्या नोंदवहीच्या सर्व पानांची प्रत आयुक्तालयास ईमेलद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

७) अर्जाचा नमुना, कागदपत्रांची यादी, अटी व शर्तीचा तपशील व हमीपत्राचा नमुना ही कागदपत्रे इच्छुक संस्थांना आपल्या कार्यालयामार्फत तसेच जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषदेमार्फत विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावेत.

८) प्रस्ताव दाखल करुन घेतल्यानंतर प्रत्येक प्रस्तावावर प्रथमदर्शनी भागात दिलेल्या पोहच पावतीची दुसरी प्रत जोडावी. पोहच पावतीची दुसरी प्रत न जोडलेले प्रस्ताव आयुक्तालयात स्वीकारले जाणार नाहीत.

(मिलींद शंभरकर)
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :- मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२ माहितीस्तव सविनय सादर

**समाज कल्याण आयुक्तालय,**
**३ चर्च रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**राज्यातील मान्यता रद्द केलेली अनुदानित वसतिगृहे हस्तांतर व स्थलांतरणाद्वारे नविन इच्छुक स्वंयसेवी संस्थांना मान्यता देण्यासाठी जाहिरात**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या आयुक्त,समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील राज्यातील मान्यता रद्द केलेली अनुदानित वसतिगृह हस्तांतर व स्थलांतर करणेबाबत शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१८/प्र.क्र.२७९/ शिक्षण-२, दि.२८/०६/२०१८ मधील अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता इच्छुक स्वंयसेवी संस्थेकडून विहीत नमुन्यात प्रस्ताव / अर्ज मागविण्यात येत आहेत.

**प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जाचा नमूना, अटी व शर्ती, अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी, प्रपत्र – अ,ब,क,ड आणि इत्यादी माहिती उपलब्ध होण्याचे ठिकाण | १) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालय<br>२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व) |
| २ | अर्जाचा नमूना, अटी व शर्ती, अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी, प्रपत्र – अ,ब,क,ड आणि इत्यादी माहिती मिळण्याचा दिनांक व वेळ | दि. ०२/०७/२०१९ पासून दि.२२/०७/२०१९ कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) |
| ३ | वसतिगृह मागणीबाबतचा प्रस्ताव / अर्ज प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालयात दाखल करण्याचा दिनांक व वेळ | दि. ०३/०७/२०१९ पासून दि.२४/०७/२०१९ सायं.५.३० वाजेपर्यंत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून. |
| ४ | इच्छुक संस्थेने प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालयात प्रस्ताव/अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. २४/०७/२०१९ सायं. ५.३० वाजेपर्यंत. |

**(मिलींद शंभरकर)**
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे

# राज्यातील मान्यता रद्द केलेली अनुदानित वसतिगृहांची यादी
# (हस्तांतरण व स्थलांतरणासाठी उपलब्ध)

| अ.क्र. | जिल्हा | मान्यता रद्द असलेले अनुदानित वसतिगृहाचे नांव व पत्ता | संस्थेचे नांव व पत्ता | मुलांचे/ मुलींचे | वसतिगृह मान्यता रद्द आदेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | धम्ममित्र बोधी विद्यार्थी वसतिगृह दिवानाका, निब्बांक टेकडी, नवी मुंबई | भारतीय बौध्द विपश्यन्ना केंद्र, ठाणे | मुलांचे | क्र. ठाणेप/सकवि/अनु.वगृह /मान्यता रद्द/ २०१५-१६/ ६८१/ठाणेदि.२०/०५/२०१५ |
| २ | धुळे | सार्वजनिक बी.सी. बोर्डींग, लांमकानी, ता.जि.धुळे | लामकानी एज्युकेशन सोसायटी, ता.जि.धुळे | मुलांचे | आदेश क्र. जिपधु/सकवि /अनुवगृह/मा.रद्द/२०१७-१८/३८३, दि.१२/०३/२०१८ |
| ३ | धुळे | कै. रुपला नानाजी गावित मुलांचे छात्रालय, पिंझारवाडी, ता.साक्री, जि.धुळे | एज्युकेशन सोसायटी, पिंझारवाडी, ता.साक्री जि.धुळे | मुलांचे | आदेश क्र. जिसकअ/जिपधु/अनु.वगृ/मा.रद्य/ ११/२०१४-१५, दि.०२/०१/२०१५ |
| ४ | धुळे | कमला नेहरु कन्या छात्रालय, पिंझारवाडी, ता.साक्री, जि.धुळे | एज्युकेशन सोसायटी, पिंझारवाडी, ता.साक्री जि.धुळे | मुलींचे | आदेश क्र. जिसकअ/जिपधु/ अनु.वगृ/मा.रद्य/११/२०१४-१५, दि.०२/०१/२०१५ |
| ५ | जळगांव | समाज विकास वसतिगृह, सिंदाड ता. पाचोरा जि.जळगांव | समाज विकास मंडळ, सिंदाड ता. पाचोरा जि.जळगांव | मुलांचे | आदेश क्र.१३५, दि.०४/०३/२०१७ |
| ६ | जळगांव | महात्मा जोतीबा मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, पाटणादेवी, ता.चाळीसगांव जि.जळगांव | ज्योती शिक्षण प्रसारक मंडळ, पारोळा, जि.जळगांव | मुलांचे | आदेश क्र.१३४, दि.०४/०३/२०१७ |
| ७ | अहमदनगर | कै. भगवानराव बोलभट मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, सोनेगांव, ता.जामखेड जि.अहमदनगर | वसंतराव भागवत एज्युकेशन सोयायटी, सोनेगांव, ता.जामखेड जि.अहमदनगर | मुलांचे | आदेश क्र.जिसकअ/अनुगृह/मा.रद्द/१८५/२०१२-१३, दि.०७/०७/२०१२ |
| ८ | अहमदनगर | शेतकरी विद्यार्थी वसतिगृह, कोपरगांव, ता.कोपरगांव, जि.अहमदगनर | शेतकरी विद्यार्थी वसतिगृह, कोपरगांव, ता.कोपरगांव, जि.अहमदगनर | मुलांचे | आदेश क्र. जिसकअ/अनु वगृह/मा.रद्द/१२२७/२०१४-१५, दि.०३/०९/२०१४ |
| ९ | पुणे | श्री.छत्रपती शिवाजी महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह आलेगाव पागा ता.शिरुर जि.पुणे | श्री.छत्रपती शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ आलेगाव पागा ता.शिरुर जि.पुणे | मुलांचे | २००९ मध्ये दिलेल्या मान्यतेपासून २०१२ पर्यंत वसतिगृह सुरु न झाल्यामुळे मु.का.अ.जि.प.पुणे यांनी मान्यता रद्द केली. |
| १० | पुणे | भैरवनाथ विदयार्थी वसतिगृह,घोटवडी,ता.खेड जि.पुणे | आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ घोटवडी,पोकुडे बु. ता.खेड,जि.पुणे | मुलांचे | आदेश क्र.जिप/सकअ/अनुवगृहे/मा.रद्द/१०००/२०१४, दि.०९/०९/२०१४ |
| ११ | सांगली | सावित्रीबाई फुले मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह सांगली | शिशु विकास मंडळ, सांगली | मुलींचे | आदेश क्र.सकआ/जिपसा/वृध्दाश्रम/मान्यता रद्द/२०१८/२०२४, दि.१९/०९/२०१८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १२ | सांगली | पसायदान मागासगर्वीय मुर्लीचे वसतिगृह, कर्नाळारोड, सांगली | पसायदान शिक्षण संस्था, सांगली | मुलींचे | |
| १३ | अमरावती | दलितोध्दार मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, पेंशनपूरा, परतवाडा, ता.अचलपूर जि.अमरावती | दलितोध्दार शिक्षण संस्था, परतवाडा | मुलांचे | मु.का.अ. यांचे आदेश क्र. १२३७, दि.७/७/२०१२ |
| १४ | वाशिम | पंचशील बी.सी. मुलांचे वसतिगृह मालेगाव ता.मालेगाव जि.वाशिम | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्था, मालेगाव, ता.मालेगाव जि.वाशिम | मुलांचे | आदेश क्र. जिसकअ/अनु वगृह/मा.रद्द/स्वा.आदेश/२०१८-१९/३०८, दि.०७/०३/२०१७ |
| १५ | वाशिम | मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, मोहरी ता.मंगरुळपीर, जि.वाशिम | ग्रामिण शिक्षण प्रसारक मंडळ, मोहरी ता.मंगरुळपीर, जि.वाशिम | मुलांचे | आदेश क्र.जिसकअ/ अनु.वअृह/मा.रद्द/स्वा.आदेश/२०१६-१७/३०९, दि.०७/०३/२०१७ |
| १६ | वाशिम | सावित्रीबाई फुले कन्या बी.सी. वसतिगृह मालेगांव ता.मालेगाव जि.वाशिम | डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक संस्था, मालेगाव, ता.मालेगाव जि.वाशिम | मुलींचे | आदेश क्र. जिसकअ/अनु वगृह/मा.रद्द/स्वा.आदेश/२०१८-१९/३०७, दि.०७/०३/२०१७ |
| १७ | वाशिम | श्री गजानन महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह, मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर जि.वाशि | आविनाश शिक्षण प्रसारक संस्था, मंगरुळपीर, ता.मंगरुळपीर जि.वाशिम | मुलांचे | आदेश क्र. जिसकअ/अनु वगृह/मा.रद्द/स्वा.आदेश/२०१८-१९/३४, दि.१०/०१/२०१९ |
| १८ | वर्धा | संत चोखामेळा मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह हळदगांव, समुद्रपुर जि. वर्धा | प्रभु विश्वकर्मा ग्रामिण बहुउद्देशिय शिक्षण संस्था, कारला रोड, वर्धा | मुलांचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. २७६२/२०१४, दि.२१.११.२०१४ |
| १९ | वर्धा | वंदनिय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह पिंपळखुटा | एकता महिला ग्रामउदयोग ग्रा.वि.संस्था, पिंपळखुटी ता.आर्वी | मुलांचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. २७६२/२०१४, दि.२१.११.२०१४ |
| २० | वर्धा | श्री गुरु संगमेश्वर मागासवर्गीय मुलांचे वसतिगृह खरांगणा ता.आर्वी जि.वर्धा | श्री गुरु संगमेश्वर समाज सुधार संस्था, खरांगणा ता.आर्वी जि.वर्धा | मुलांचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. २५२०/२०१३, दि.३०/११/२०१३ |
| २१ | वर्धा | संत ज्ञानेश्वर मुलांचे वसतीगृह, समुद्रपुर ता. समुद्रपुर जि.वर्धा | प्रभु विश्वकर्मा ग्रामिण बहुउद्देशिय शिक्षण संस्था, कारला रोड, वर्धा | मुलांचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. ५७३/२०१६, दि.१९/०३/२०१६ |
| २२ | वर्धा | शहीद स्मृती मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह साहुर, ता.आष्टी, जि. वर्धा | हुतात्मा स्मारक समिती आष्टी,ता.आष्टी, जि. वर्धा | मुलांचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. ५७३/२०१६, दि.१९/०३/२०१६ |
| २३ | वर्धा | कै.भिमराव कासटवार स्मृती मुलांचे वसतीगृह सालोड, जि.वर्धा | परमहंस सोशल वेलफेअर सोसायटी, सालोड (हि) | मुलांचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. ५७३/२०१६, दि.१९/०३/२०१६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २४ | वर्धा | संत मुक्ताबाई मा. मुलींचे वसतीगृह, मांडगांव ता. समुद्रपुर जि.वर्धा | प्रभु विश्वकर्मा ग्रामिण बहुउद्देशिय शिक्षण संस्था, कारला रोड, वर्धा | मुलींचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. २७६२/२०१४, दि.२१.११.२०१४ |
| २५ | वर्धा | हुतात्मा स्मारक मागासवर्गीय मुलींचे वसतीगृह, आष्टी, ता.आष्टी, जि. वर्धा | हुतात्मा स्मारक समिती आष्टी,ता.आष्टी, जि. वर्धा | मुलींचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. ५७४/२०१६, दि.१९/०३/२०१६ |
| २६ | वर्धा | इंदिरा गांधी मेमोरीयल मुलींचे वसतीगृह सालोड | परमहंस वेलफेअर सोसायटी सालोड | मुलींचे | मु.का.अ.यांचे आदेश क्र. ५७३/२०१६, दि.१९/०३/२०१६ |
| २७ | वर्धा | स्व. कमला नेहरु मागावर्गीय मुलींचे वसतिगृह देवळी ता.देवळी, जि. वर्धा | विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, वर्धा | मुलींचे | जिसकअ/जिपव/अनुवगृह/मा.रद्द/आदेश/१६१२/२०१८, दि.०३/१०/२०१८ |
| २८ | वर्धा | हुतात्मा स्मारक मागासवर्गीय मुलांचे वसतीगृह पिंपळखुटा | हुतात्मा स्मारक समिती आष्टी | मुलांचे | जिसकअ/जिपव/अनुवगृह/मा.रद्द/आदेश/१६११/२०१८, दि.०३/१०/२०१८ |
| २९ | वर्धा | अआदिवासी छात्रालय, हिंगणघाट | अआदर्श आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ, हिंगणघाट, जि.वर्धा | मुलांचे | |
| ३० | भंडारा | वीर भाऊराव मुलांचे वसतिगृह, वरठी, | युगांतर शिक्षण संस्था, नागपुर | मुलांचे | मु.का.अ. यांचे आदेश क्र. सकअ/जिप/भंडारा/अनुवगृह/मा.रद्द/२०१३-१४/१८७, दि.०७/०६/२०१४ |
| ३१ | भंडारा | इंदूताई कन्या वसतिगृह भुयार ता पवनी जिल्हा भंडारा | शारदा महिला मंडळ भुयार | मुलींचे | मु.का.अ. यांचे आदेश क्र. सकअ/जिप/भंडारा/अनुवगृह/मा.रद्द/२०१३-१४/१५६९, दि.१९/१२/२०१३ |
| ३२ | भंडारा | राणी दुर्गावती कन्या वसतिगृह ता.लाखनी, मुरमाडी | भारतीय आदिवासी शिव शिक्षण संस्था गराडा,ता लाखनी | मुलींचे | अति.मु.का.अ. यांचे आदेश क्र. सकअ/जिप/भंडारा/अनुवगृह/मा.रद्द/२०१६-१७/१२७, दि.२९/०७/२०१७ |
| ३३ | गोंदिया | डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय वसतिगृह, तिरोडा, ता.तिरोडा जि.गोंदिया | डॉ.बाबासाहेब आंबेडकर एज्युकेशन सोसायटी, तिरोडा, ता.तिरोडा जि.गोंदिया | मुलांचे | आदेश क्र.७१७, दि.२६/०७/२०१७ |
| ३४ | चंद्रपुर | सिध्दार्थ वसतिगृह, चंदनखेडा, ता.भद्रावती जि.चंद्रपुर | सिध्दार्थ विकास ज्ञानप्रबोधनी संस्था, शेगांव(बु.) ता.वरोरा जि.चंद्रपुर | मुलांचे | अति.मु.का.अ यांचे आदेश क्र.सकवि/अनवगृह/मा.रद्द/७३८/१४, दि.१२/०९/२०१४ |
| ३५ | चंद्रपुर | श्री.कृष्ण आदिवासी मुलांचे वसतिगृह,मोटेगाव ता.चिमुर जि.चंद्रपुर | आदिवासी विविध कार्यकारी सोसायटी, मोटेगाव ता.चिमुर जि.चंद्रपुर | मुलांचे | मु.का.अ. यांचे आदेश क्र. सकअ/अनुवगृह/मा.रद्द/कार्यात्तर मान्यता/३३९ चंद्रपुर/०७-०८, दि.०६/१०/२००७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३६ | लातूर | कै.वसंतराव नाईक विदयार्थी वसतिगृह जळकोटरोड,उदगीर जि.लातूर | वि.भ.जा.सौ.समिती धोंडवाडी,ता जळकोट जि.लातूर | मुलांचे | आदेश क्रं.२४३८, दि.१८.११.२०१४. |

# अर्जाचा नमूना (प्रपत्र-अ)

(प्रत्येक ठिकाणासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

समाज कल्याण आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य पुणे

(शासन निर्णय दि.२६/०३/१९९८ मधील परिशिष्ट "ब" प्रमाणे)

**अर्ज क्र. :** **अर्ज मिळाल्याचा दिनांक :**

**अर्ज सादर केलेला दिनांक :** **अर्ज स्विकारणाऱ्याची स्वाक्षरी :**

------------- (संस्थेचे नाव) ------------ **संचलित** ------------(वसतिगृहाचे नाव) ---------------- **हे मान्यता रद्द अनुदानित मागासवर्गीय वसतिगृह हस्तांतर व स्थलांतरीत करुन मिळणेबाबतच्या मान्यतेसाठी करावयाचा अर्जाचा नमुना.**

| अ. क्र. | माहितीचा तपशील | इच्छुक संस्थेने भरावयाची माहिती |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित वसतिगृहाचे नाव व पुर्ण पत्ता : | |
| २ | इच्छुक संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता : | |
| ३ | इच्छुक स्वयंसेवी संस्थेची संस्था नोंदणी अधिनियमा सन १८६० अंतर्गत नोंदणीबाबतचा क्र. व दिनांक | |
| ४ | इच्छुक स्वयंसेवी संस्थेची धर्मादायी आयुक्तांकडे सार्वजनिक विश्वस्त अधिनियम सन १९५० अंतर्गत नोंदणीबाबतचा क्र. व दिनांक | |
| ५ | संस्थेच्या घटनेतील उद्देशामध्ये वसतिगृह चालविणे किंवा शैक्षणिक कार्याबाबत नोंद असल्याबाबतचे घटनेतील कलम क्र. व पान क्र. | |
| ६ | संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची नाव व पत्ता :<br>१) अध्यक्ष<br>२) उपाध्यक्ष<br>३) कोषाध्यक्ष<br>४) सचिव | |
| ७ | इच्छुक संस्थेस वसतिगृह / शैक्षणिक संस्था चालविण्याबाबतचा किमान ४ ते ५ वर्षाचा अनुभव | |

-

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | असल्याबाबतचा तपशील : | | | | | | |
| ८ | वसतिगृहासाठी संस्थेकडे मालकीची अथवा भाडे तत्वावरील उपलब्ध असलेल्या ३ हजार चौ.फुट इमारतीबाबतचा तपशील : | इमारत मालकाचे महसुली कागदपत्रानुसार नाव : | | | इमारतीचे वसतिगृहाच्या वापरासाठी उपलब्ध असलेले एकुण क्षेत्रफळ चौ.फुट | | |
| ९ | वसतिगृह इमारतीचे विवरण खोल्यानिहाय क्षेत्रफळ | वापर | क्षेत्रफळ चौ. फुट | वापर | क्षेत्रफळ चौ. फुट | वापर | क्षेत्रफळ चौ. फुट |
| | | विद्यार्थी निवास :<br>स्वयंपाकगृह:<br>भोजनगृह:<br>भांडारगृह :<br>कार्यालय : | | अधिक्षक निवास :<br>चौकीदार निवास :<br>वाचनालय पुस्तके | (संख्या) | प्रसाधनसगृह<br>स्नानगृह :<br>बैठे व मैदानी खेळाची जागा: | (संख्या)<br>(संख्या) |
| १० | संस्थेच्या कार्यरत वसतिगृहातील गैरप्रकार/निधीचा अपहार या बाबत धर्मदाय आयुक्त, शासन, न्यायालय यांनी संस्थेस केलेला दंड व संस्थेविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा तपशील द्यावा. | | | | | | |
| ११ | संस्थेने यापुर्वी शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती किंवा कसे ? असल्यास, ती प्रलंबित आहे का, किंवा निकाल लागला असल्यास त्याची माहिती द्यावी. | | | | | | |
| १२ | वसतिगृहाचा उपलब्ध साहित्य (स्वतंत्र सूची जोडावी)<br>१) फर्निचर<br>२) भांडीकुंडी<br>३) खेळ साहित्य | | | | | | |
| १३ | वसतिगृहाचे प्रस्तावासाठी संस्थेने शासन खाती ना परतावा तत्वावर भरण्यासाठी रु.१०,०००/- च्या धनाकर्ष (Demand Draft) ची माहिती | धनाकर्ष क्रमांक : | धनाकर्ष दिनांक : | | राष्ट्रीयकृत बँकेच्या शाखेचे नाव : | | धनाकर्षाची रक्कम : |
| १४ | संस्थेने वसतिगृहाचे व्यवस्थापनेकरिता र.३,००,०००/- निधी कायम स्वरुपी बँकेत ठेवला आहे काय ? | बँकेचे नाव व पत्ता : | खाते क्रमांक: | | बँकेतील जमा निधीचा कालावधी : | | बँकेचे प्रमाणपत्र : |
| १५ | शासकीय अनुदानाशिवाय | १) | | | | | |

<table>
<tr><td></td><td>संस्थेला होणाऱ्या आर्थिक मदतीची साधने कोणती ?</td><td colspan="6">२)<br>३)</td></tr>
<tr><td>१६</td><td>अ) वसतिगृहास ज्या गावी मान्यता हवी आहे त्या गावी सुरु असलेली वसतिगृहांची माहिती :<br>ब) प्रस्तावाच्या गावातील शासकीय वसतिगृहांची माहिती</td><td colspan="6">मुलांचे वसतिगृह संख्या :--------------- विद्यार्थी संख्या :------------------<br>मुलींचे वसतिगृह संख्या :--------------- विद्यार्थीनी संख्या :---------------<br>एकुण : ------------- एकुण :----------------<br>मुलांचे वसतिगृह संख्या :--------------- विद्यार्थी संख्या :------------------<br>मुलींचे वसतिगृह संख्या :--------------- विद्यार्थीनी संख्या :---------------<br>एकुण : ------------- एकुण :----------------</td></tr>
<tr><td>१७</td><td>वसतिगृहास ज्या गावात स्थलांतर हवे आहे, त्या गावात इयत्ता ५ वी पासून पुढील वर्ग असलेल्या शाळांची माहिती</td><td colspan="6">मुलांच्या शाळांची संख्या :<br>मुलींच्या शाळांची संख्या :<br>संयुक्त शाळा संख्या:<br>एकुण</td></tr>
<tr><td rowspan="2">१८</td><td rowspan="2">इच्छुक संस्थेने संस्थेच्या उद्देशाप्रमाणे केलेल्या खर्चाबाबतचा मागील ३ वर्षांचा तपशील (सनदीची लेखापालाच्या अहवालाने)</td><td colspan="2">आर्थिक वर्ष २०१५-१६</td><td colspan="2">आर्थिक वर्ष २०१६-१७</td><td colspan="2">आर्थिक वर्ष २०१७-१८</td></tr>
<tr><td>जमा</td><td>खर्च</td><td>जमा</td><td>खर्च</td><td>जमा</td><td>खर्च</td></tr>
</table>

सही
संस्था सचिव

सही
संस्था अध्यक्ष

(प्रपत्र-ब)

## अनुदानित मान्यता रद्द वसतिगृह इच्छुक संस्थांना हस्तांतरीत व स्थलांतरीत करण्यासाठी अटी व शर्ती

| अ. क्र. | अटी व शर्ती |
|---|---|
| १ | इच्छुक संस्थेने प्रस्तावाच्या सर्व अटी व शर्ती प्रमाणे प्रस्ताव दाखल केला म्हणजे संस्थेचा वसतिगृह हस्तांतरण व स्थलांतरण मिळविण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला असे गृहीत धरता येणार नाही. मान्यता रद्द वसतिगृह इच्छुक संस्थांना हस्तांतरित व स्थलांतरित करण्याबाबतचे अंतिम अधिकार शासनास आहेत. |
| २ | इच्छुक संस्थांना मान्यता रद्द वसतिगृह हस्तांतरण व स्थलांतरण मान्यता दिल्यानंतर त्या वसतिगृहाची मान्य संख्या २०+४ =२४ एवढीच राहिल. विद्यार्थी प्रवेश शासनाने निर्धारित केलेल्या आरक्षणानुसारच करावे लागतील. |
| ३ | इच्छुक स्वयंसेवी संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. |
| ४ | संस्थेच्या लिखीत व धर्मदाय आयुक्तांनी मान्यता दिलेल्या घटनेतील उद्दिष्टांमध्ये वसतिगृह किंवा शैक्षणिक प्रकल्प चालविणे हा उद्देश असणे आवश्यक आहे. |
| ५ | इच्छुक संस्थेस अनुदानित वसतिगृह / शैक्षणिक संस्था चालविण्याचा किमान ४ ते ५ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| ६ | इच्छुक संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबत सनदी लेखापालांने संस्थेच्या केलेल्या अहवालाचे मागिल ३ वर्षाचे लेखापरिक्षण अहवाल प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ७ | अर्जासोबत संस्थेने **लेखाधिकारी ,(कर्ज)समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य ,पुणे** यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचा रु. १०,०००/- चा **धनाकर्ष )Demand Draft)** प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| ८ | इच्छुक संस्थेकडे हस्तांतरण व स्थलांतरणाद्वारे वसतिगृह मान्यता दिल्यास ते वसतिगृह चालविण्यासाठी संस्थेकडे रु.३ लक्ष मुदत ठेव किंवा संस्थेच्या खात्यावर प्रस्तावाच्या दिनांकास शिल्लक असणे आवश्यक आहे. |
| ९ | इच्छुक संस्थेस हस्तांतरण व स्थलांतरणाद्वारे मान्यता मिळाल्यास प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी प्रति विद्यार्थी किमान ४० चौ.फुट जागा व आवश्यक त्या सर्व भौतिक सुविधांसह ३ हजार चौ.फुट जागा असलेली इमारत प्रस्ताव दाखल करतेवेळी वसतिगृहासाठी संस्थेकडे मालकीची किंवा भाडयाची इमारत उपलब्ध असणे आवश्यक आहे. |
| १० | प्रस्तावित वसतिगृहासाठी संस्थेने भाडयाची इमारत दर्शविली असेल तर वसतिगृह मान्यतेच्या ३ वर्षानंतर इच्छुक संस्थेस वसतिगृहाची इमारत संस्थेच्या मालकीची बांधणे बंधनकारक आहे. |
| ११ | इच्छुक संस्थेविरुध्द, संस्थेच्या प्रकल्पाविरुध्द धर्मदाय आयुक्तांनी, शासनाने किंवा न्यायालयाने संस्थेतील गैरप्रकार, निधीचा अपहार याबाबत शिक्षा दिलेली असेल, दंड आकारलेला असेल किंवा कोणतीही कार्यवाही केलेली असेल, तर त्याबाबतची सविस्तर माहिती, कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडणे संस्थेस बंधनकारक आहे. |
| १२ | इच्छुक संस्थेने यापुर्वी शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली असेल, याबाबत न्यायालयाचे आदेश झालेले असतील तर त्याची सविस्तर माहिती व अहवाल प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक आहे. |
| १३ | मान्यता रद्द वसतिगृहाचे मानधनावरील मान्यता दिलेले कर्मचारी इच्छुक संस्थेस हे वसतिगृह हस्तांतरण व स्थलांतर मान्यता दिल्यानंतर, या वसतिगृहावर समायोजित करुन घेणे संस्थेस बंधनकारक राहील. |
| १४ | इच्छुक संस्थेस हस्तांतर व स्थलांतरणाने मान्यता दिल्यानंतर कोणत्याही नविन पदास मान्यता दिली जाणार नाही. इतर अनुदानित वसतिगृहातील विद्यार्थी संख्या कमी झाल्याने व त्यांची मान्यता रद्द केल्याने त्या वसतिगृहातील कर्मचाऱ्यांचे जेष्ठतेनुसार समायोजन केले जाईल. |
| १५ | मान्यता रद्द वसतिगृहातील कर्मचाऱ्यांचे समायोजन ज्या हस्तांतरीत व स्थलांतरीत वसतिगृहात करण्यात आले आहे. तेथे सदर समायोजित सर्व कर्मचाऱ्यांनी ३० दिवसांच्या आत रुजू होणे आवश्यक आहे. |

| | |
|---|---|
| १६ | मान्यता रद्द वसतिगृहातील कर्मचाऱ्यांचे समायोजन केल्यानंतर कर्मचारी हजर न झाल्यास याच प्रकारच्या त्या कर्मचाऱ्यास आणखिन दोन संधी दिल्या जातील. या तीन्ही संधीमध्ये समायोजित कर्मचारी नियुक्तीच्या ठिकाणी रुजू न झाल्यास त्यांना सेवेची आवश्यकता नाही असे समजून त्यांची सेवा समाप्त केली जाईल. |
| १७ | विद्यार्थी संख्ये अभावी बंद पडलेले अनुदानित वसतिगृह (मान्यता रद्द केलेले अनुदानित वसतिगृह) पुन्हा त्याच ठिकाणी सुरु करण्यास परवानगी दिली जाणार नाही. |
| १८ | इच्छुक संस्थेस हस्तांतरण व स्थलांतरणाद्वारे वसतिगृहास मान्यता दिल्यानंतर हे वसतिगृह, शैक्षणिक वर्ष २०१९-२० सुरु झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत कार्यान्वित करणे बंधनकारक आहे. विहित मुदतीत वसतिगृह सुरु न झाल्यास सदर अनुदानित वसतिगृहाचे हस्तांतरण व स्थलांतरण आपोआप रद्द झाल्याचे समजण्यात येईल. |
| १९ | इच्छुक संस्थेच्या कार्यकारणीमध्ये वाद नसल्याबाबत योग्यती कागदपत्रे व हमीपत्र / प्रमाणपत्र उपलब्ध करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. |
| २० | संबंधीत इच्छुक संस्थेच्या कार्यकारणीविरुध्द व कार्यकारणीतील सदस्यांविरूध्द संस्थेच्या, शासनाच्या निधीचा अपहार, गैरवापर, संस्थेच्या मालकीच्या स्थावर अगर जंगम मालमत्तेचे नुकसान करणे यासंबंधी स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल असल्यास अथवा सदर गुन्ह्यामध्ये संस्थेस/ संबंधीत सदस्यास समक्ष न्यायालयाकडून शिक्षा झालेली असल्यास त्याबाबत सर्व पुरावे आणि कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| २१ | इच्छुक संस्थेच्या कार्यकारणीच्या चारित्र्याबाबत पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. |
| २२ | इच्छुक संस्थेने अटी व शर्ती प्रमाणे वसतिगृह हस्तांतरण व स्थलांतरण मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर केल्यानंतर राज्यातील प्राप्त हस्तांतर व स्थलांतर प्रस्तावांचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर सदर संस्थेस मान्यता मिळाली नाही तर संस्थेस त्यांचा प्रस्ताव नाकारल्याबाबत स्वतंत्ररित्या कळविण्याची जबाबदारी शासन यंत्रणेवर राहणार नाही. |
| २३ | प्रादेशिक उपायुक्त, यांनी अनुदानित वसतिगृहाबाबत हस्तांतरण व स्थलांतरणासाठी दिलेल्या जाहिरातीची मुदत संपल्यानंतर शासनाच्या कोणत्याही कार्यालयात दाखल होणारे मुदतीनंतरचे प्रस्ताव कोणत्याही परस्थितीत हस्तांतरण व स्थलांतरणासाठी विचारात घेतले जाणार नाहीत. |
| २४ | प्रादेशिक उपायुक्त, यांनी अनुदानित वसतिगृहाबाबत हस्तांतरण व स्थलांतरणासाठी दिलेल्या जाहिरीतीनुसार प्राप्त झालेले प्रस्ताव कोणत्याही कारण न देता रद्द करण्याचे अंतिम अधिकार शासनाकडे आहेत. |
| २५ | प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण कार्यालया व्यतिरिक्त इतर कोठेही प्रस्ताव स्विकारले जाणार नाही. तसेच प्रादेशिक उपायुक्त, कार्यालया व्यतिरिक्त दाखल होणाऱ्या प्रस्तावावर मान्यतेसाठी कोणताही विचार होणार नाही. |
| २६ | अनुदान मान्यता रद्द वसतिगृहाचे हस्तांतरण व स्थलांतरण मान्यतेबाबत शासन निर्णय दि.२८/०६/२०१८ मधील शासन निर्णयाद्वारे गठीत आयुक्त, समाज कल्याण, पुणे यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती प्रस्तावांची छाणनी करुन प्रस्ताव मान्यतेसाठी शासनास सादर करणार आहे. |

**वरील प्रमाणे सर्व अटी व शर्तीबाबत सर्व संस्था सदस्य सहमत असून संस्थेस या सर्व अटी व शर्ती मान्य आहेत.** सही

संस्था सचिव

सही

संस्था अध्यक्ष

## प्रपत्र - ड

# हमीपत्र

## (५०० रुपयाच्या जनरल स्टॅम्प पेपरवर)

(शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१८/प्र.क्र.२७९/ शिक्षण-२, दि.२८/०६/२०१८अन्वये मान्यता रद्द अनुदानित वसतिगृह हस्तांतर व स्थलांतरणाची मागणी करणाऱ्या इच्छुक स्वयंसेवी संस्थेकडून घ्यावयाच्या हमीपत्राचा नमुना)

मी श्री / श्रीमती -------------------------------, वय — --------, व्यवसाय —------- रा. --------------------------------- ( ~~संपुर्ण पत्ता~~ ) सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

मी ------------------------------------------------------- (~~संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता~~) या संस्थेची / संस्थेचा अध्यक्ष / सचिव असून सदर संस्था सोसायटीज रेजिस्ट्रेशन अ‍ॅक्ट १८६० व मुंबई पब्लीक ट्रस्ट अ‍ॅक्ट १९५० मधील तरतुदीनुसार मा. धर्मादाय आयुक्त, ---- (~~ठिकाण~~)---- यांच्या कार्यालयाकडे नोंदणीकृत असुन सदर नोंदणीपत्राचा अनुक्रमांक अनुक्रमे ---------------- व ---------------------------- असे आहेत.

आमच्या संस्थेने ---------------------------------------------------- (~~संस्थेचे नांव व पुर्ण पत्ता~~) --------------------- ----- (~~उपक्रमाचे नांव व पत्ता~~ ) हे मान्यता रद्द वसतिगृह सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१८ अन्वये प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार आमच्या संस्थेस हस्तांतरीत व स्थलांतरीत करून मिळण्याकरिता विहीत कार्यपध्दतीने व विहीत नमुन्यातील प्रस्ताव प्रादेशिक उपायुक्त, यांचे कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर केलेला आहे.

१. सदर प्रस्तावात पान क्र. १ ते --------- पाने असून जोडपत्र ------ते ------- आहेत. शासनाने आखुन दिलेल्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय दिनांक २८/०६/२०१८ मधील सर्व अटी आणि शर्ती मी/आम्ही वाचलेले असून त्या आम्हास पूर्ण मान्य आहेत.
२. सदर प्रस्तावासोबत संस्थेने पत्ता, ईमेल, फोन नं., मोबाईल नं., फॅक्स, वेबसाईट या संदर्भात दिलेली माहिती खरी व बरोबर असून त्यात बदल करावयाचा झाल्यास तशा बदलाची माहिती शासनाच्या संबंधीत कार्यालयास संस्थेकडून लागलीच कळविण्यात येईल. याची संस्था हमी देत आहे.
३. प्रस्ताव दाखल करतेवेळी आमच्या संस्थेच्या कार्यकारणीत कोणतेही वाद नाहीत. अगर ते न्यायप्रविष्ठ नाहीत. तसेच संस्था व संस्थेच्या पदाधिकाऱ्यांविरूध्द संस्थेच्या मालकीच्या जंगम अगर स्थावर मालमत्तेच्या अपहारासंबंधी तसेच संस्थेच्या उपक्रमाअंतर्गत प्रवेशित मुला-मुलींच्या लैंगिक शोषणाबाबत कसल्याही फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल नाहीत.
४. आमच्या संस्थेविरूध्द शासनाने अथवा मा. धर्मादाय आयुक्त कार्यालयाने अद्याप कोणतीही दंडात्मक अथवा प्रशासकीय स्वरूपाची कारवाई केलेली नाही. किंवा तशी कारवाई प्रस्तावित देखील नाही.
५. जाहिरातीमध्ये प्रसिध्द केलेले मान्यता रद्द वसतिगृह आमच्या संस्थेस हस्तांतरीत व स्थलांतरीत करण्यास शासनाने मान्यता दिल्यास सदर वसतिगृह शासन निकषाप्रमाणे व दि.१६/०३/१९९८ च्या शासन निर्णयात निर्देशित केलेल्या सोयी सवलती देणे आमच्या संस्थेवर बंधनकारक राहील याची आम्हाला जाणीव आहे. सदर सोई सुविधा दिल्याबद्दल खात्री करण्यासाठी शासनाकडून त्रयस्थ यंत्रणेमार्फत वसतिगृहाची तपासणी करण्यात येणार असल्यास त्यास आमच्या संस्थेची कसलीही हरकत असणार नाही. भविष्यात वेळोवेळी वसतिगृहाबाबत शासन ज्या नवीन अटी व शर्ती वा निकष लागू करेल त्या अनुषंगाने कार्यवाही करणे आमच्या संस्थेवर बंधनकारक राहील.
६. शासनाकडून वसतिगृहाकरिता जे अनुदान सुत्र निश्चित राहील त्या दराने काही कारणाने अनुदान न मिळाल्यास संस्था स्वत: खर्च करण्याचे मान्य करीत आहे.
७. वसतिगृह हस्तांतरणाचा शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर विहीत मुदतीत वसतिगृह कार्यान्वित करण्याची जबाबदारी संस्थेची राहील. विहीत मुदतीत वसतिगृह कार्यान्वित न केल्यास सदरचे हस्तांतरण व स्थलांतरण अपोआप रद्द होईल याची जाणीव आहे.
८. वसतिगृहाचा गुणात्मक दर्जा सातत्याने उत्कृष्ट श्रेणीचा राहील याबाबत या हमीपत्राव्दारे हमी देण्यात येत आहे.

उक्त मजकुर माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याचे सत्यतेकामे मी संस्थेचा / संस्थेची अध्यक्ष / सचिव म्हणून आज रोजी पुणे मुक्कामी या हमीपत्रावर सही / स्वाक्षरी केलेली आहे.

**स्थळ :-**

**दिनांक :-** .०२.२०१९

सही
संस्था सचिव

सही
संस्था अध्यक्ष

**प्रपत्र - क**

## मान्यता रद्द अनुदानित वसतिगृह इच्छुक स्वयंसंस्थेकडून जोडावयाच्या साक्षांकित कागदपत्रांची यादी.

| अ.क्र | कागदपत्रे | प्रस्तावातील पान क्र. |
|---|---|---|
| १ | संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी झालेबाबत प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत | |
| २ | सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदणीच्या प्रमाणपत्राची साक्षांकीत प्रत | |
| ३ | संस्थेच्या लिखीत घटनेची धर्मादाय आयुक्त यांनी मान्य केलेली साक्षांकीत प्रत | |
| ४ | इच्छुक संस्थेच्या पदाधिकारी व सदस्यांचा नाव, पत्ता, दुरध्वनी क्रमांक, व्यवसाय, वय, इत्यादी सर्व तपशील | |
| ५ | अर्जासोबत संस्थेने **लेखाधिकारी ,(कर्ज)समाज कल्याण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य ,पुणे** यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेचा रु. १०,०००/- **चा धनाकर्ष )Demand Draft)** प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| ६ | संस्थेने बँक खात्यात रु.०३.०० लक्ष जमा असल्याबाबत बँकेचे मुळ प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडावे. | |
| ७ | मागणी केलेल्या स्थलांतरणाच्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या शाळा, वसतिगृहांची माहिती विद्यार्थी संख्येसह सोबत जोडावी. | |
| ८ | मागील ०३ वर्षाच्या संस्थेच्या आर्थिक व्यवहाराबाबत सनदी लेखापालांने संस्थेच्या केलेल्या लेखा परिक्षणाचे अहवालाच्या साक्षांकीत प्रती सोबत जोडाव्यात. | |
| ९ | इच्छुक संस्थेस मुला / मुलींचे वसतिगृह चालविण्याचा किंवा शैक्षणिक संस्था चालविण्याबाबतचा ४ ते ५ वर्षाच्या अनुभवाबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सोबत जोडावे. | |
| १० | इच्छुक संस्थेचे प्रकल्प व पदाधिकारी आणि सदस्य यांचे विरुध्द गैरप्रकाराबाबत, निधीच्या अपहाराबाबत केलेली शिक्षा व दंड या बाबतचा सविस्तर अहवाल योग्य त्या कागदपत्रांसह सोबत जोडावा. | |
| ११ | संस्थेचे पॅनकार्ड ची साक्षांकीत प्रत. | |
| १२ | इच्छुक संस्थेने यापुर्वी शासनाविरुध्द वसतिगृह संबंधाने कोणत्याही न्यायालयात याचिका, अर्ज, दाखल केलेला असल्यास व त्याबाबतचा निकाल लागलेला असल्यास त्याचा तपशील व निकाल सोबत जोडावा. | |
| १३ | इच्छुक संस्थेच्या कार्यकारणीच्या चारित्र्याबाबत पोलीस विभागाचे चारित्र्य प्रमाणपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| १४ | इच्छुक संस्थेकडे या वसतिगृहासाठी सर्व भौतिक सुविधायुक्त ३ हजार चौ.फुटाची इमारत मालकीची किंवा भाडेतत्वावरील इमारत उपलब्ध असल्याबाबतचे कागदपत्रे व अहवाल प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| १५ | संस्थेची स्वत:ची जागा/जमीन असल्यास ७/१२ चा उतारा साक्षांकीत प्रत | |
| १६ | संस्थेची स्वत:ची इमारत असल्यास, मालमत्तेबाबतच्या प्रमाणापत्राची साक्षांकीत प्रत | |
| १७ | इमारतीच्या बांधकामाबाबत सक्षम अधिकाऱ्यांने दिलेल्या सर्व क्षेत्रफळाच्या नोंदीसह बांधकाम परवान्यासह पुर्णत्वाचा दाखल्याची साक्षांकीत प्रत | |
| १८ | इमारत भाडयाची असल्यास, मालकाचे नोंदणीकृत भाडे करारपत्र साक्षांकीत प्रत | |
| १९ | शासनाने ठरवून दिलेले नियम बंधनकारक असतील याबाबत संस्था प्रमुखांचे १००/- रुपयाच्या स्टॅम्प पेपरवरील नोटराईज्ड हमीपत्र. | |

| | | |
|---|---|---|
| २० | स्वंयसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबाबत माहिती (सोबतच्या नमुन्यात.) | |
| २१ | संस्थेच्या पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता, ईमेल, फोन नं., ईमेल, फॅक्स, वेबसाईट (असल्यास) | |
| २२ | अनुदानित वसतिगृहास देय बाबीवरील अनुज्ञय खर्चाची प्रतीपुर्ती वेळोवेळी शासनाच्या ध्येय धोरणानुसार व अनुदानाच्या उपलब्धतेनुसार केली जाईल. शासकीय अनुदानास विलंब झाल्यास इच्छुक संस्थेस हस्तांतरण व स्थलांतरणानंतर मान्यता दिल्यानंतर ते वसतिगृह संस्थेच्या स्वनिधीतून उत्तमरित्या चालविण्याची जबाबदारी संस्थेची आहे. याबाबत संस्थेने १०० रुपयांच्या बंधपत्रावर या आशयाचे संमतीपत्र प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. | |
| २३ | इच्छुक संस्थेच्या कार्यकारणीमध्ये वाद नसल्याबाबत योग्यती कागदपत्रे व हमीपत्र / प्रमाणपत्र उपलब्ध करणे संस्थेवर बंधनकारक राहिल. | |
| २४ | संबंधीत इच्छुक संस्थेच्या कार्यकारणीविरुध्द व कार्यकारणीतील सदस्यांविरूध्द संस्थेच्या, शासनाच्या निधीचा अपहार, गैरवापर, संस्थेच्या मालकीच्या स्थावर अगर जंगम मालमत्तेचे नुकसान करणे यासंबंधी स्थानिक पोलिस स्टेशनमध्ये गुन्हे दाखल असल्यास अथवा सदर गुन्ह्यामध्ये संस्थेस/ संबंधीत सदस्यास समक्ष न्यायालयाकडून शिक्षा झालेली असल्यास त्याबाबत सर्व पुरावे आणि कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडणे आवश्यक आहे. | |

सही
संस्था सचिव

सही
संस्था अध्यक्ष

## प्रपत्र - इ

### स्वंयसेवी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांबाबत माहिती

| अ.क्र | पदाधिकारी/हुद्दा | नांव व पूर्ण पत्ता (पिनकोड व दुरध्वनी क्रमांकासह) | वय | शिक्षण | जातीचा प्रवर्ग | व्यवसाय |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | अध्यक्ष | | | | | |
| २ | उपाध्यक्ष | | | | | |
| ३ | सचिव | | | | | |
| ४ | कोषाध्यक्ष | | | | | |
| ५ | सदस्य | | | | | |
| ६ | सदस्य | | | | | |
| ७ | सदस्य | | | | | |
| ८ | सदस्य | | | | | |
| ९ | सदस्य | | | | | |
| १० | सदस्य | | | | | |
| ११ | सदस्य | | | | | |

ठिकाण -

शिक्का

दिनांक -

**समाज कल्याण आयुक्तालय,**
**३ चर्च रोड, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**राज्यातील मान्यता रद्द केलेली अनुदानित वसतिगृहे हस्तांतर व स्थलांतरणाद्वारे नविन इच्छुक स्वंयसेवी संस्थांना मान्यता देण्यासाठी जाहिरात**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासनाच्या आयुक्त,समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अधिपत्याखालील राज्यातील मान्यता रद्द केलेली अनुदानित वसतिगृह हस्तांतर व स्थलांतर करणेबाबत शासन निर्णय क्र.बीसीएच-२०१८/प्र.क्र.२७९/ शिक्षण-२, दि.२८/०६/२०१८ मधील अटी व शर्तीनुसार मान्यता देण्यासाठी शैक्षणिक वर्ष २०१९-२० करीता इच्छुक स्वंयसेवी संस्थेकडून विहीत नमुन्यात प्रस्ताव / अर्ज मागविण्यात येत आहेत.

**प्रस्ताव सादर करण्याचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | अर्जाचा नमूना, अटी व शर्ती, अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी, प्रपत्र – अ,ब,क,ड आणि इत्यादी माहिती उपलब्ध होण्याचे ठिकाण | १) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालय<br>२) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व) |
| २ | अर्जाचा नमूना, अटी व शर्ती, अर्जासोबत जोडावयाच्या कागदपत्रांची यादी, प्रपत्र – अ,ब,क,ड आणि इत्यादी माहिती मिळण्याचा दिनांक व वेळ | दि. ---/०७/२०१९ पासून दि.----/०७/२०१९ कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) |
| ३ | वसतिगृह मागणीबाबतचा प्रस्ताव / अर्ज प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालयात दाखल करण्याचा दिनांक व वेळ | दि. ---/०७/२०१९ पासून दि.----/०७/२०१९ सायं.५.३० वाजेपर्यंत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालयीन वेळेत सुट्टीचे दिवस वगळून. |
| ४ | इच्छुक संस्थेने प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व) यांचे कार्यालयात प्रस्ताव/अर्ज दाखल करण्याचा अंतिम दिनांक | दि. ----/०७/२०१९ सायं. ५.३० वाजेपर्यंत. |

**(मिलींद शंभरकर)**
आयुक्त, समाज कल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे